# शालेय भाषेची पूर्वतयारी

शालेय भाषेची पूर्वतयारी ही एका वा काही दिवसांची बाब नसते. ही तयारी जन्मापासूनच चालू असते. अगदी नजर स्थिर होणे किंवा नजरेचा टप्पा विस्तारणे, ही पहिल्या काही महिन्यांत घडून येणारी गोष्टही, भाषेच्या पूर्वतयारीच्या इतिहासात गणता येते किंवा याच कालावधीत भाषा ऐकणे आणि इतरांच्या बोलण्यातील उच्चारांची भिन्नता ओळखू लागणे, हेही बालकाच्या भाषेच्या तयारीतील सुरुवातीचे पण महत्त्वाचे पाऊल असते. याचा अर्थ असा की, पहिल्या तीन वर्षांमध्ये भाषाविषयक अनुभव कसकसे मिळतात वा मिळत नाहीत, यात भाषा शिक्षणाची मुळे दडलेली असतात. मुलांना अगदी लहान वयांत भरपूर भाषिक अनुभव देणारे सुसंस्कृत कुटुंब आणि अशा अनुभवांपासून वंचित ठेवणारे अजाण कुटुंब यांच्या मुलांच्या भाषिक प्रगतीमध्ये कसा फरक पडतो हे दाखविणारे काही अभ्यास उपलब्ध आहेत. त्यामुळे, घरांतील भाषाशिक्षण हा सामान्यतः दुर्लक्षित असा विषय, हा बालशिक्षणाचा एक अविभाज्य भाग म्हणून समाज-जाणीवेत येण्याची गरज आहे. तीन ते सहा या वयात बालशाळांमध्ये काही खास प्रयत्न करून, मागील काळातील उणीवा काही प्रमाणात भरून काढणे शक्य होते ते मेंदूच्या बदलशीलतेमुळे किंबहुना यामुळेच आपण, शालेयपूर्व शिक्षणावर, शालेय शिक्षणातील भाषा शिक्षणाचा भर काही प्रमाणात टाकू शकतो.

हा भार नेमका कोणता असावा याविषयी फारशी साशंकता आता बालशिक्षणशास्त्राने ठेवलेली नाही. बालशिक्षणाचे शास्त्र हे एक प्रगत आणि प्रगतशील असे शास्त्र आहे. त्याचा पाश्चात्य आणि भारतीय इतिहास मोठा आहे. अलीकडच्या शालेय शिक्षणात जो रचनावादी शिक्षणाचा विचार आला आहे, तो गेले शतकभर तरी बालशिक्षणात रुजू झालेला आहे. आधुनिक मेंदू संशोधनाने या शास्त्रात दुहेरी भर घातली आहे. एक म्हणजे, बालकांचे आठ वर्षापर्यंतचे वय हे मेंदू घडणीचे वय म्हणून म्हटले आहे. आणि दुसरे म्हणजे, आयुष्यभराच्या भाषा शिक्षणातील सर्वात संवेदनशील, सर्वात वेगवान असा भाषा आत्मसात करण्याचा कालावधी, हा वयाच्या सहा वर्षापर्यंतचा कालावधी आहे, असे दाखवून दिले आहे. शास्त्रीय बालशिक्षणाची एक नवीन चौकटच या दोन, मेंदू संशोधनविषयक निष्कर्षांनी नव्याने घालून दिलेली आहे. या नव्या चौकटीत भाषेचे बालशिक्षण कसे करावे, याचा एक नमुना आता निर्माण झाला आहे. लेखनपूर्व आणि वाचनपूर्व तयारीसाठी शिशुवाडी-बालवाडीमध्ये मुलांना कोणते भाषानुभव द्यायचे याची काहीशी निश्चिती आता झाल्याचे आढळून येते.

साधारणपणे घराच्या नि परिसरातील व्यावहारिक अनुभवांतून मुले सहजतेने आपली पहिली भाषा आत्मसात करीत जातात. वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत सुमारे १०००० ते १३००० शब्दांची मालमत्ता, आपल्या

स्मृतीकोशात मुलांनी साठविलेली असते. पुढील काळातील भाषिक विकासाच्या गुंतवणूकीसाठी इतकी मोठी शब्दसंपत्ती प्रत्येक मुला-मुलीकडे उपलब्ध असते. प्राथमिकच्या वयातील लेखन-वाचन शिकण्यासाठी सर्वात महत्त्वाची पूर्वतयारी हीच असते. बारकाव्याने पाहिले तर या शालेयपूर्व तयारीचे भाषाविषयक तीन घटक येथे महत्त्वाचे ठरतात.

एक, मुलांना भाषा बोलता येत असते.
दोन, भाषा ही दुसऱ्याकडून ऐकून समजण्याची ताकद मुलांना आलेली असते, आणि
तीन, वयाच्या मानाने अफाट अर्थपूर्ण शब्दांचा संग्रह मुलांकडे साठलेला असतो.

**संपर्काचे साधन**

भाषा हे माणसाचे अन्य माणसांशी संपर्क साधण्याचे साधन असते. या संपर्ककार्यात भाषेचे स्थान दुहेरी असते. 'ग्रहणशील' (receptive) असणे हे भाषेचे एक रूप तर अभिव्यक्त होणे (expressive) हे भाषेचे दुसरे रूप. ही दोन्हीही कार्यरूपे अतिशय महत्त्वाची आहेत, तसेच ती वेगवेगळी असून परस्परपूरक आहेत. लेखन-वाचनापूर्वी या दोन्हीही अंगांनी भाषा विकसित होणे, ही भाषा प्रगतीची मूलभूत पूर्वतयारी असते. या दोन्ही कार्यरूपांत निसर्गतः काहीशी क्रमवारी असते. म्हणजे ग्रहणशील भाषा आधी विकसित होऊ लागते, तर अभिव्यक्ती थोडी उशिरा विकसित व्हायला सुरुवात होते. त्यामुळे असे आढळून येते की, बोलता येण्यापूर्वीच बालकाला दुसऱ्यांनी बोललेले समजू लागलेले असते. साधारणपणे चार वर्षाचे बालवाडीत जाणारे मूल बोलताना सुमारे २३०० शब्दांचा वापर करू लागलेले असते. पण त्याचवेळी, सुमारे ८००० शब्द त्यांना ऐकून समजायला लागलेले असतात. समाजाशी समरस होण्यासाठी ही शब्दसंपत्ती आवश्यकच असते.

भाषेचा संपर्क साधन म्हणून वापर होण्यासाठी संपर्काच्या वाढत्या संधी मुलांना मिळाव्या लागतात. मुलांना इतर मुलांबरोबर व अन्य प्रौढांबरोबर अधिकाधिक मिसळण्याच्या संधी बालवयात मिळणे, याचा अर्थ त्यांची भाषा आकलण्याची नि अभिव्यक्तीची शब्दसंपत्ती वाढवणे होय. ही वाढती शब्दसंपत्ती हा आकलनयुक्त वाचन-लेखनाचा पाया असतो. त्यामुळे शिशुवाडीत आणि बालवाडीत (आणि अर्थातच, नंतरही पुढे) मुलांना सतत दुसऱ्यांच्या संपर्कात येण्याच्या संधी पुरविल्या जाव्यात. बालशाळेत हे जाणूनबुजून केले जाते. लहान वयांतील विद्यार्थ्यांना घरचा अभ्यास (गृहपाठ) न देण्यामागचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. मुलांना घरचा वेळ शाळेतील 'अभ्यास' करण्या-घोकण्यात न घालविता तो मोकळा ठेवला तर तो वेळ, मुले, स्वयंप्रेरणेने इतरांच्या

संपर्कात खेळण्या-बडबडण्यात आणि जुळवून घेण्यात घालवतात. भाषा समृद्धीसाठी आणि सामाजिक अभिसरणासाठी हा वेळ उपयुक्त ठरतो. अर्थातच, शाळेतील व शाळेबाहेरील शिक्षणास फार मोठे सहाय्य होते.

**मेंदूमधील भाषातयारी**

लिहिण्या-वाचण्यासाठी लागणारी पूर्वतयारी फार सुंदर रीतीने, जन्मापासून मेंदूमध्ये होत जाते. भाषा ऐकणे, समजावून घेणे, बोलणे, अर्थपूर्ण शब्द आत्मसात करणे यांतून शब्दोच्चारांचा नि शब्दार्थांचा फार मोठा साठा मेंदूमध्ये तयार होत असतो. त्याचबरोबर तोंड व घसा यांतील स्नायूंची उच्चार करताना होणाऱ्या हालचालींची तयारीही मेंदू घडवून आणत असतो.

बोलणे किंवा तोंडावाटे उच्चार करणे हा वाचनाचा पाया असतो. शब्द जेव्हा कागदावर लिहिलेला असतो तेव्हा आपण शब्दोच्चारच दृश्य स्वरूपात पाहत असतो. त्यामुळे 'चांगला' वाचक हा असा पाहिलेला शब्द उच्चारांच्या स्वरूपातच मेंदूमध्ये साठवीत असतो, मग शब्द पाहताक्षणीच त्याचा उच्चार मेंदूत जागृत होतो; त्यामुळे वाचन सहज होते.

तसे पाहिले असता, मेंदूच्या पातळीवर वाचन ही खूप गुंतागुंतीची प्रक्रिया असते. वाचन क्रियेमध्ये शब्द पाहणे, शब्द उच्चारणे आणि शब्दार्थ उमगणे अशा तीन क्रिया अभिप्रेत असतात. मेंदूरचनेमध्ये या तिन्ही क्रियांची स्थाने वेगवेगळी असतात. चांगल्या वाचनासाठी ही तिन्ही स्थाने एकाचवेळी जागृत व्हावी लागतात; याचाच दुसरा अर्थ असा की, त्यांच्यामधील परस्परसंपर्क त्वरेने व्हावा लागतो. म्हणूनच डाव्या मेंदूतील ही केंद्रे एकमेकांजवळ निसर्गतःच असतात ! वाचन अटकाव असलेल्या (dyslexic) मुलांच्या बाबतीत या संपर्कात कुठेतरी अडथळा निर्माण होत असतो. त्यांच्यातील संपर्काचा रस्ता नीटपणे तयार झालेला नसतो.

कार्यक्षम वाचनासाठी आणखी एक गोष्ट असावी लागते. ज्या शब्दाचे वाचन आपण करू पाहत आहोत तो शब्द आधीच आपल्या स्मृती पटलावर कोरलेला असावा लागतो. तोही अगदी तीनही स्तरांवर. म्हणजे, शब्दाचे दृश्य रूप (स्वतंत्रपणे) स्मृतीत असायला हवे. त्याचा उच्चार (स्वतंत्रपणे) स्मृतीत साठलेला हवा आणि त्याचा अर्थही माहीत असायला हवा. वाचन-क्षमतेविषयीच्या अलीकडच्या मेंदू संशोधनातून असे आढळून आले आहे की, 'शब्दोच्चार स्मृती' ही चांगल्या वाचनासाठी अधिक प्रभावीपणे काम करते. त्यामुळे लहान वयातच मुलांना शब्दोच्चारांचे सर्व अनुभव देत गेले तर, वाचनक्रिया मुले कार्यक्षमतेने करू लागतात. कारण, त्यांचा मेंदूमधील उच्चारस्थान व अर्थस्थान यांमधील मार्ग रुळलेला असतो . शब्दोच्चार – स्वर – हा केवळ ध्वनी नसतो तर मुखामधील स्नायूंच्या हालचालींनीयुक्त असा तो ध्वनी असतो. त्यामुळे, मुले जेव्हा शब्दोच्चारांचा

सराव करतात तेव्हा ती हा उच्चार (ध्वनी) केवळ कानांनी ऐकत नाहीत तर तो स्नायूंच्या हालचालींकरवीही 'ऐकत' असतात; किंवा स्नायूंच्या हालचालींच्या स्वरूपात (बोलण्याची कृती) लक्षात ठेवतात, असे म्हणता येईल. यात 'स्नायू स्मृती' समाविष्ट असल्यामुळे हा मार्ग चांगल्या वाचनासाठी चांगलाच प्रभावी ठरतो. मेंदूमधील या प्रक्रियांबाबतच्या माहितीचा उपयोग वर्गशिक्षणात करता येतो. मुलांना नव्याने आकलनात येणारे शब्दोच्चार घटवून घेण्याने, शब्दोच्चार स्मृती व स्नायू स्मृती एकाचवेळी घट्ट होत जातात. त्यामुळे असे शब्दोच्चार शिक्षण पहिली-दुसरीच्या स्तरावर, अधिक प्रमाणांत देणे हितावह ठरते.

बालवयातील घरचे, परिसरातील व बालशाळेतील भाषाशिक्षण हा माणसाच्या भाषिक शिक्षणाचा पाया असतो; आणि तो संबंधित प्रौढांनी जाणीवपूर्वक घडवावा लागतो !

❖